**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**परकीय भाषा विभाग**

परकीय भाषा विभाग सन २०२०-२१ करिता खालील परकीय भाषांचे
अर्धवेळ अभ्यासक्रम जाहीर करत आहे.

*फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन, स्पॅनिश*

अभ्यासक्रम :

१. प्रमाणपत्र अभ्यासक्रम / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम
२. पदविका अभ्यासक्रम / जलद पदविका अभ्यासक्रम
३. प्रगत पदविका अभ्यासक्रम
४. विशेष पदविका अभ्यासक्रम

केंद्रे :

- या वर्षी सर्व प्रमाणपत्र व जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने शिकवले जातील.
- प्रत्येक भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा केवळ एक ३० विद्यार्थीसंख्येचा वर्ग दर शनिवारी व रविवारी परकीय भाषा विभाग येथे होईल. ही सोय ज्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकणे अशक्यच आहे अशांसाठी आहे.
- अर्ज भरताना बॅचेसचे दोन प्राधान्यक्रम द्यायचे असतात. शक्यतोवर तुमच्या पहिल्या, जागा भरल्यास दुसऱ्या पसंतीची बॅच द्यायचा आमचा प्रयत्न असतो. एखाद्या बॅचला अतिच प्रतिसाद असेल तर ज्या बॅचमध्ये जागा असेल ती बॅच तुम्हाला देण्यात येते. गुणवत्ता यादी बॅचसकट प्रसिद्ध केली जाते. जागेची मर्यादा असल्याने प्रत्यक्ष वर्गात येऊन शिकण्याची बॅच सर्वांना मिळू शकणार नाही हे उघड आहे. मग तुम्ही दिलेल्या पर्यायी ऑनलाइन बॅचसाठी प्रवेश घेणे किंवा प्रवेशच न घेणे याचा निर्णय घेऊ शकता. ऑनलाइन बॅच स्वीकारताना अर्थातच त्यासाठी आवश्यक ती आंतरजालीय जोडणी तुमच्याकडे असणे अपेक्षित आहे.
- जपानी भाषेचे सर्वच वर्ग ऑनलाइन पद्धतीनेच होतील.
- पदविका व त्यापुढील अभ्यासक्रमांचे वर्ग परकीय भाषा विभाग येथे जास्तीत जास्त ३० विद्यार्थी संख्येपर्यंत भरतील. अधिकचा प्रतिसाद आल्यास त्यांचा समावेश ऑनलाइन पद्धतीत केला जाईल.
- प्रत्यक्ष वर्गात येऊन शिकणे व ऑनलाइन पद्धतीने शिकणे यात अदलाबदल करता येणार नाही.

  - **1. एक वर्षाच्या कालावधीचे अभ्यासक्रम**
  - अध्यापन १ ऑगस्ट २०२० ते ३१ मार्च २०२१ आठवड्यातून ३ दिवस, रोज २ तास या प्रमाणे ; शनि-रवि होणारी बॅच तीन-तीन तासांची असेल. परीक्षा एप्रिल २०२१ मध्ये होईल.
  - **2. अर्धवर्षीय जलद अभ्यासक्रम**
  - अध्यापन ४॥ महिने १ ऑगस्ट ते ११ डिसेंबर २०२० ; आठवड्यातून ५ दिवस, रोज २ तास या प्रमाणे; परीक्षा डिसेंबर २०२० मध्ये होईल.

## शैक्षणिक अर्हता

- नव्याने शिकणायांसाठी- (प्रमाणपत्र अभ्यासक्रम / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम) दहावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण
- एप्रिल / मे २०२० मध्ये ठरवलेल्या परीक्षा यंदा होऊ शकल्या नाहीत. प्रत्येक पुढील इयत्तेची अर्हता आधीची इयत्ता उत्तीर्ण अशी असते. त्यामुळे अशा मेदवारांनी "Appeared" हा पर्याय निवडावा व तुमचे हॉल तिकिट पुरावा म्हणून जोडावे. जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या जानेवारी ते मे २०२० या कालावधीत शिकलेल्या इच्छुक उमेदवारांनी आपले ओळखपत्र जोडावे.
- आधीची परीक्षा उत्तीर्ण, समकक्ष अर्हताधारक व २०१९-२०चे विद्यार्थी अशा सर्वांनाच या वर्षी पदविका, जलद पदविका, प्रगत पदविका व विशेष पदविकाच्या या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. त्याचा तपशील लवकरच जाहीर केला जोईल.

* समकक्ष परीक्षांची माहिती त्या त्या भाषेअंतर्गत पाहून घ्यावी

## Schedule for Admissions

| | From | To |
|---|---|---|
| Forms available on the Website | १३ जून २०२० | २० जुलै २०२० |

इतर तपशील इमेलने कळण्यात येईत.

**शुल्काचा तपशील** सर्व भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी स्तरनिहाय व निवासानिहाय

1. प्रवेश अर्ज शुल्क : खुला गट Rs 500/- आरक्षित गट Rs 350/- प्रत्येक अभ्यासक्रमासाठी. पुढे प्रवेश न घेतल्यास परतावा मिळणार नाही.
2. अभ्यासक्रम शुल्क – – हे अर्धवेळ अभ्यासक्रम ऐच्छिक आहेत व त्यास कोणतीही शुल्क सवलत लागू होत नाही.

| अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | अभ्यासक्रम शुल्क रुपयांमध्ये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र निवासी दाखलाधारक | इतर भारतीय राज्यातील निवासी दाखलाधारक | SAARC देशांतील नागरिक | इतर देशांचे नागरिक |
| प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course) | एक शैक्षणिक वर्ष | 4104 | 8123 | 8123 | 12182 |
| जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Intensive Certificate Course) | साडेचार महिने | 4754 | 9443 | 9443 | 14132 |
| पदविका अभ्यासक्रम (Diploma Course) | एक शैक्षणिक वर्ष | 4754 | 9443 | 9443 | 14132 |
| जलद पदविका अभ्यासक्रम (Intensive Diploma Course) | साडेचार महिने | 5430 | 9880 | 9880 | 14530 |
| प्रगत पदविका अभ्यासक्रम (Advanced Diploma Course) | एक शैक्षणिक वर्ष | 6054 | 12043 | 12043 | 18032 |
| विशेष पदविका अभ्यासक्रम (Special Diploma Course) | एक शैक्षणिक वर्ष | 6704 | 13343 | 13343 | 19982 |

## भाषावार अर्हता व तुकड्या

**वि. सू. - सामाजिक आरक्षण लागू केल्यानंतर**

(i) सर्व भाषांतील इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मूलभूत अर्हताधारकांसाठी ७० टक्के तर समकक्ष अर्हताधारकांसाठी ३० टक्के जागा राखीव. जर यापेक्षा वेगळे प्रमाण असेल तर त्याचा उल्लेख त्या त्या भाषेअंतर्गत केला आहे.

(ii) प्रमाणपत्र अभ्यासक्रम व जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी २ जागा जुन्या ११वी मॅट्रिक (१९७५पूर्वी) उत्तीर्णांसाठी राखीव.

(iii) प्रमाणपत्र अभ्यासक्रम व जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा नाही. कृपया आपले दहावीचे **नेमके गुण** लिहावेत, गुणवत्ता यादी त्यावर आधारित असेल. केवळ श्रेणी लिहिणे गुणवत्ता यादी करण्यासाठी पुरेसे नाही.

(iv) **पदविका व त्यापुढील इयत्तांच्या सर्वच उमेदवारांसाठी प्रवेश परीक्षा होईल. गुणवत्ता यादी त्यानुसारच जाहीर होईल.**

### जपानी भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **जपानी भाषेचा**<br>**प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br><br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक JLPT N5 (Old pattern Yonkyuu) असले तरी |
| **जपानी भाषेचा**<br>**पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जपानी भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br><br>**समकक्ष अर्हता :** JLPT Level 5 (Yonkyu) ही परीक्षा किमान ७५ टक्के मिळवून उत्तीर्ण. किंवा JLPT Level 4 (Sankyu) ही परीक्षा किमान उत्तीर्ण. |
| **जपानी भाषेचा**<br>**प्रगत पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जपानी भाषेच्या पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br><br>**समकक्ष अर्हता :** JLPT Level 4 (Sankyu) ही परीक्षा किमान ७५ टक्के मिळवून उत्तीर्ण. किंवा JLPT Level 3 (Nikyu) ही परीक्षा उत्तीर्ण. |
| **जपानी भाषेचा विशेष भाषांतर व सांस्कृतिक पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता:** (सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जपानी भाषेच्या प्रगत पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. (७०% जागा)<br><br>**समकक्ष अर्हता :** JLPT Level 3 (Nikyu) ही परीक्षा किमान ७५ टक्के मिळवून उत्तीर्ण. किंवा JLPT Level N2 किंवा JLPT Level 1 उत्तीर्ण |

| २०२०-२१साठी जपानी भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| **जपानी भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : ३००)** | | | | | |
| J C 1 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| J C 2 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | १० ते १२ | Online | पन्नास |
| J C 3 | सोम - बुध - शुक्र | दुपार | ४ ते ६ | Online | पन्नास |
| J C 4 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| J C 5 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| J C 6 | शनि - रवि | दुपार | १.३० ते ४.३० | Online | पन्नास |
| **जपानी भाषेचा पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : १००)** | | | | | |
| J D 1 | शनि - रवि | सकाळ ते दुपार | १० ते १ | Online | पन्नास |
| J D 2 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| **जपानी भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ५०)** | | | | | |
| J A 1 | मंगळ- गुरु- शनि | सकाळ | ७.३० ते ९.३० | Online | पन्नास |
| **जपानी भाषेचा विशेष पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ५०)** | | | | | |
| J S 1 | मंगळ- गुरु- शनि | सकाळ | ७.३० ते ९.३० | Online | पन्नास |

**फ्रेंच भाषेसाठी शैक्षणिक अर्हता**

| | |
|---|---|
| **फ्रेंच भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **फ्रेंच भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **फ्रेंच भाषेचा पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>(सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. बारावीला फ्रेंच भाषेत १०० गुणांच्या परीक्षेत किमान ७० गुण पडून परीक्षा उत्तीर्ण. तसेच फ्रेंच बोलता येणे आवश्यक.<br>२. कला / वाणिज्य विद्याशाखेच्या प्रथम वर्षात फ्रेंच भाषेत प्रगत स्तरावर किमान ७० टक्के गुण. तसेच फ्रेंच बोलता येणे आवश्यक.<br>१. ३. मान्यताप्राप्त संस्थेत फ्रेंच भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण. तसेच फ्रेंच बोलता येणे आवश्यक. |
| **फ्रेंच भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>(सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. कला विद्याशाखेच्या द्वितीय वर्षात फ्रेंच भाषेत सामान्य स्तरावर किमान ७५ टक्के गुण<br>२. कला विद्याशाखेच्या द्वितीय वर्षात फ्रेंच भाषेत विशेष स्तरावर किमान ६० टक्के गुण.<br>३. मान्यताप्राप्त संस्थेत फ्रेंच भाषेचे ३६० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण. |
| **फ्रेंच भाषेचा व्यापारविशेष पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>(सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या प्रगत पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. कला विद्याशाखेची पदवी, त्यात सामान्य स्तरावर फ्रेंच भाषेत किमान ७० टक्के गुण.<br>२. कला विद्याशाखेची पदवी, त्यात विशेष स्तरावर फ्रेंच भाषेत किमान ६० टक्के गुण.<br>3. मान्यताप्राप्त संस्थेत फ्रेंच भाषेचे ५०० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण. |

| २०२०-२१साठी फ्रेंच भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| फ्रेंच भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : ३३०) | | | | | |
| F C 1 | मंगळ - गुरु - शनि | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| F C 2 | सोम - बुध - शुक्र | दुपार | ४ ते ६ | Online | पन्नास |
| F C 3 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| F C 4 | मंगळ - गुरु - शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| F C 5 | मंगळ - गुरु - शुक्र | दुपार | ४ ते ६ | Online | पन्नास |
| F C 6 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| F C 7 | मंगळ - गुरु - शनि | सकाळ | ८.३० ते १०.३० | F.L. Department | तीस |
| फ्रेंच भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : १००) | | | | | |
| F I C 1 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| FIC 2 | सोम ते शुक्र | दुपार | ४ ते ६ | Online | पन्नास |
| फ्रेंच भाषेचा पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ११०) | | | | | |
| F D 1 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| F D 2 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| F D 3 | मंगळ - गुरु - शनि | प्रतिसादानुसार | स. ८.३० ते १०.३० **किंवा** सायं. ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| फ्रेंच भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ५०) | | | | | |
| F A 1 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| फ्रेंच भाषेचा व्यापारविशेष पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : २०) | | | | | |
| F S C | मंगळ - गुरु - शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | वीस |

## जर्मन भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **जर्मन भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **जर्मन भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **जर्मन भाषेचा पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>(सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. बारावीला जर्मन भाषेत १०० गुणांच्या परीक्षेत किमान ७० गुण पडून परीक्षा उत्तीर्ण.<br>२. कला / वाणिज्य विद्याशाखेच्या प्रथम वर्षात जर्मन भाषेत नवशिक्या किंवा प्रगत स्तरावर किमान ७० टक्के गुण.<br>३. मान्यताप्राप्त संस्थेत जर्मन भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण.<br>४. GI / MMB ची A2 स्तराची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण (‘Gut’ श्रेणी). |
| **जर्मन भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>(सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या पदविका / जलद पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. कला विद्याशाखेच्या द्वितीय वर्षात जर्मन भाषेत सामान्य अथवा विशेष स्तरावर किमान ६० टक्के गुण.<br>२. मान्यताप्राप्त संस्थेत जर्मन भाषेचे ३६० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण.<br>३. GI / MMB ची B2 स्तराची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण (‘Gut’ श्रेणी). |
| **जर्मन भाषेचे व्यापारविशेष / भाषांतरविशेष पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा) (सावित्रीबाई फुले) पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या प्रगत पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. कला विद्याशाखेची पदवी, त्यात सामान्य अथवा विशेष स्तरावर जर्मन भाषेत किमान ६० टक्के गुण.<br>२. मान्यताप्राप्त संस्थेत जर्मन भाषेचे ५०० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण.<br>3. GI / MMB ची C1 स्तराची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण (‘Gut’ श्रेणी). |

| २०२०-२१साठी जर्मन भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| **जर्मन भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : ४३०)** | | | | | |
| G C 1 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| G C 2 | सोम - बुध - शुक्र | दुपार | ४ ते ६ | Online | पन्नास |
| G C 3 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 4 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 5 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 6 | मंगळ-गुरु-शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 7 | मंगळ-गुरु-शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 8 | मंगळ-गुरु-शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G C 9 | शनि - रवि | सकाळ | १० ते १ | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| **जर्मन भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : १५०)** | | | | | |
| G I C 1 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| G I C 2 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| G I C 3 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| **जर्मन भाषेचा पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ९०)** | | | | | |
| G D 1 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| G D 2 | मंगळ-गुरु-शनि | दुपार | ४ ते ६ | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| G D 3 | मंगळ-गुरु-शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| **जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ३०)** | | | | | |
| GID 1 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| **जर्मन भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ५०)** | | | | | |
| G A 1 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| **जर्मन भाषेचा भाषांतरविशेष पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ३०) किमान ५ आवश्यक** | | | | | |
| G S T | सोम - बुध | Evening | 6.30 – 8.30 pm | FL Dept. Pune 4 | 30 |
| **जर्मन भाषेचा व्यापारविशेष पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : ३०) किमान ५ आवश्यक** | | | | | |
| G S C | मंगळ - गुरु | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |

## रशियन भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **रशियन भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **रशियन भाषेचा पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>पुणे विद्यापीठाची रशियन भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>१. बारावीला रशियन भाषेत १०० गुणांच्या परीक्षेत किमान ७० गुण पडून परीक्षा उत्तीर्ण.<br>२. मान्यताप्राप्त संस्थेत रशियन भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याच्या परीक्षेत किमान ८०% गुण |
| **रशियन भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>पुणे विद्यापीठाची रशियन भाषेच्या पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा)<br>मान्यताप्राप्त संस्थेत रशियन भाषेचे ३५० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७०% गुण |
| **रशियन भाषेचा विशेष पदविका अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :**<br>पुणे विद्यापीठाची रशियन भाषेच्या प्रगत पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** पात्रता ठरविण्यासाठी आवश्यकता भासल्यास प्रवेश परीक्षा. |

| २०२०-२१साठी रशियन भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| **रशियन भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा : ८०)** | | | | | |
| R C 1 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| R C 2 | शनि - रवि | सकाळ | ८ ते ११ | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | तीस |
| **रशियन भाषेचा पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : २०)** | | | | | |
| R D 1 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | वीस |
| **रशियन भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : १५)** | | | | | |
| R A 1 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | पंधरा |
| **रशियन भाषेचा विशेष पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा : १०)** | | | | | |
| R S 1 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | दहा |

## स्पॅनिश भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **स्पॅनिश भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **स्पॅनिश भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | **मूलभूत अर्हता :** SSC/ CBSC/ ICSE ची दहावीची परीक्षा उत्तीर्ण<br>**समकक्ष अर्हता :** १९७५पूर्वीचे ११वी मॅट्रिक |
| **स्पॅनिश भाषेचा पदविका अभ्यासक्रम** | **अर्हता :** पुणे विद्यापीठाची स्पॅनिश भाषेच्या प्रमाणपत्र/ जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** DELE A2 किंवा FYBA स्पॅनिश घेऊन उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त संस्थेत स्पॅनिश भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७५ टक्के गुणांनी उत्तीर्ण. किंवा बारावीत स्पॅनिशमध्ये किमान ७५ टक्के गुण तसेच स्पॅनिश बोलता येणे आवश्यक |
| **स्पॅनिश भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम** | **अर्हता :** पुणे विद्यापीठाची स्पॅनिश भाषेच्या पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** DELE B1 किंवा SYBA स्पॅनिश घेऊन उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त संस्थेत स्पॅनिश भाषेचे ३६० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७५ टक्के गुणांनी उत्तीर्ण. |
| **स्पॅनिश भाषेचा विशेष पदविका अभ्यासक्रम** | **अर्हता :** पुणे विद्यापीठाची स्पॅनिश भाषेच्या प्रगत पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** DELE B2 किंवा BA स्पॅनिश ( विशेष/सर्वसाधारण ) घेऊन उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त संस्थेत स्पॅनिश भाषेचे ५०० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ७५ टक्के गुणांनी उत्तीर्ण. |

**२०२०-२१साठी स्पॅनिश भाषेच्या तुकड्या**

| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **स्पॅनिश भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा १००)** | | | | | |
| S C 1 | मंगळ- गुरु- शनि | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| S C 2 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| **स्पॅनिश भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा ५०)** | | | | | |
| S I C 1 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| **स्पॅनिश भाषेचा पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा ६०)** | | | | | |
| S D 1 | सोम - बुध - शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | परकीय भाषा विभाग | तीस |
| S D 2 | सोम - बुध - शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग | तीस |
| **स्पॅनिश भाषेचा प्रगत पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा ३०)** | | | | | |
| S A 1 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग | तीस |
| **Special Diploma in Spanish (Total : 30 seats)** | | | | | |
| S S 1 | मंगळ- गुरु- शनि | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग | तीस |

# Instructions

**सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे नियम पाळून होतील.**

**प्रवेसाची प्रक्रिया -**

1. प्रथम https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx या संकेतस्थळावर जा. परकीय भाषा विभागाच्या अर्धवेळ अभ्यासक्रमांचे प्रवेशप्रक्रियाही आता येथूनच होईल. तुमचे खाते नसेल तर **Sign up** या शब्दांवर टिचकी मारून तुमचे खाते निर्माण करा.
2. जर तुम्ही गेल्या वर्षी परकीय भाषेच्या एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल किंवा गेल्या किंवा या वर्षी दुस-या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी खाते उघडले असेल तर त्याच नावाने पुन्हा त्यात प्रवेश करा (Log in).
3. नव्याने खाते निर्माण करताना जे वापरकर्ता नाव व त्याचा परवलीचा संकेत (password) तुम्ही ठरवला असेल त्याची माहिती तुम्ही दिलेल्या इमेल पत्त्यावर तुम्हाला कळवली जाईल. हे वापरकर्ता नाव व त्याचा परवलीचा संकेत यांची नंतरही आवश्यकता असेल. तरी ते स्मरणात ठेवावेत अथवा नंतर इमेलमधून घ्यावेत.
4. https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx या संकेतस्थळावरून बाहेर न पडता लगेच किंवा नंतर Log in करुन तुम्ही अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करु शकता. त्यात सर्व तपशील नीट भरा. आधार क्रमांक जोडणेही आवश्यक आहे. कोणाचे अजून आधार कार्ड काढून झाले नसेल तर तात्पुरता शून्य हा आकडा भरावा म्हणजे प्रक्रिया पूर्ण करता येईल. नंतर मात्र तो क्रमांक परकीय भाषा विभागाला कळवावा. तसेच तुमचा रक्तगटही नोंदवणे आवश्यक आहे.
5. तुमचे एक छायाचित्र स्कॅन करून त्यावर जोडा. (selfie नको). तेच छायाचित्र तुमच्या ओळखपत्रावर लावण्यासाठी प्रवेश नक्की कराल तेव्हा (म्हणजे अभ्यासक्रम शुल्क भरल्यानंतर) आणा. तुम्हाला तुमची सहीदेखील स्कॅन करून जोडायची आहे. आरक्षित संवर्गातील उमेदवारांनी आपले संवर्ग प्रमाणपत्रही जोडणे आवश्यक आहे.
6. सर्व प्राथमिक माहिती नोंदवल्यानंतर विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी Application for Entrance यावर टिचकी मारावी. मग Apply for Course यावर टिचकी मारावी. तुम्हाला काही पर्याय दिसतील. त्यातील ALL किंवा Humanities निवडा. तेथे वरती Diploma and Certificate Courses हा मजकूर दिसेल. त्याच्याशेजारचे बटन निवडा. एवढे केल्यावर तुम्हाला परकीय भाषा विभागाचे सर्व अभ्यासक्रम दिसू शकतील. तुम्हाला पाहिजे तो अभ्यासक्रम निवडा.
7. वि. सू. २०१९-२० वर्षाच्या परीक्षा एप्रिल २०२०मध्ये होणार होत्या. त्याच्या आधारावर पदविका व त्यापुढील अभ्यासक्रमासाठी अर्ज भरताना Qualifying exam / eligibility मध्ये २०१९-२०मधील तुम्ही पूर्ण केला अभ्यासक्रम निवडून "Passed" ऐवजी "Appeared" असा पर्याय निवडावा. त्या परीक्षेचे हॉल तिकिट जोडावे.
8. जानेवारी ते मे २०२० मध्ये जलद प्रमाणपत्र वा जलद पदविका अभ्यासक्रम ज्यांनी पूर्ण केला त्यांच्या परीक्षा अर्जांची प्रक्रिया झालेली नाही. अशा उमेदवारांनीही "Appeared" असा पर्याय निवडावा. व हॉल तिकिटाऐवजी अभ्यासक्रमाचे ओळखपत्र जोडावे.
9. मार्च २०२० मध्ये दहावीची परीक्षा दिलेल्यांनाही प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांचे अर्ज भरताना "Appeared" हा पर्याय निवडावा लागेल. अशा विद्यार्थ्यांना कसे सामावून घेता येईल ते

पाहण्यासाठी “Passed” की “Appeared” या माहितीची आम्हाला आवश्यकता आहे. दहावीचे हॉल तिकिट जोडण्याची गरज नाही.

10. ज्यांनी शैक्षणिक अर्हतेची परीक्षा आधीच उत्तीर्ण केली असेल त्यांनी “Passed” निवडून ते गुण भरावेत.
11. अर्जाचे शुल्क भरेपर्यंत तुम्हाला तुमच्या अर्जातील तपशील बदलता येईल. एकदा अर्जाचे शुल्क भरले की अर्जात कोणताही बदल करता येणार नाही तसेच त्याच अभ्यासक्मासाठी आणखी एक अर्जही भरता येणार नाही.
12. अर्जाचे शुल्क रु ५०० (किंवा रु ३५०) ऑनलाइन भरायचे आहे. त्यानंतर तुम्हाला print हा पर्याय दिसेल. अर्ज आपल्या संगणकावर उतरवून ठेवा व छापून ठेवा. अर्जाची तीन पाने असतील. अर्ज, कबुलीनामा, व पैसे मिळाल्याची पोच - अशी एकूण ३ पाने असतील. पोचपावतीवर तुमचा अर्ज क्रमांकही असेल.
13. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणा-यांनो, तुम्ही एकापेक्षा अधिक भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी किंवा एकाच भाषेच्या प्रमाणपत्र आणि जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी अर्ज करून ठेवू इच्छित असल्यास प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नव्याने चलन निर्माण करून प्रत्येकी ५०० (किंवा ३५०) रुपये भरावे लागतील. तुमचे नाव एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीत आले तरी **प्रवेश कोणत्यातरी एकाच अभ्यासक्रमाला घेता येईल**. इतर अभ्यासक्रमांच्या अर्जाचे शुल्क परत मिळणार नाही.
14. प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र या अभ्यासक्रमाच्या उमेदवारांना त्यांच्या कागदपत्र पडताळणी बाबत स्वतंत्र इमेल येईल.
15. प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र परीक्षांचे प्रवेश दहावीच्या गुणांवरव सामाजिक आरक्षणाचे नियम पाळून होतील.
16. पदविका व त्यापुढील अभ्यासक्रमांसाठी सर्व उमेदवारांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. त्याचा तपशील लवकरच जाहीर करण्यात येईल.
17. सर्व गुणवत्ता याद्या परकीय भाषा विभाग तसेच https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx आणि परकीय भाषा विभागाचे पान http://unipune.ac.in/dept/fine_arts/foreign_languages/default.htm येथे उपलब्ध होतील.